बी.ए तृतीय वर्ष
अभ्यास पत्रिका नववी- मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतीहास प्रारंभ ते १६00
विषय-वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान

डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे
कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार

# वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान-

- वारकरी संप्रदाय हा मूलतः भक्तिपंथ आहे; म्हणून त्याला आधारभूत असलेल्या तत्त्वज्ञानात पांडित्याचा प्रपंच नाही. भक्तिरसात न्हालेल्या संतांचा अनुभव, हेच त्या तत्त्वज्ञानाचे अंतिम प्रमाण होय.
- सकृद्दर्शनी असे वाटते, की भक्तीचे समर्थन करणारे तत्वज्ञान मध्वाचार्यांच्या मतासारखे द्वैतवादी असावयास हवे. देव हा भक्ताहून वेगळा असल्याशिवाय त्याची भक्ती करावयाची कशी ? केवलाद्वैत वेदान्ताच्या म्हणण्याप्रमाणे ब्रह्मच केवळ सत्य असले आणि मीच ब्रह्म असेन, तर भक्ती करावयाची कोणी आणि कुणाची?

- वारकरी संप्रदाय हा मूलतः भक्तिपंथ आहे; म्हणून त्याला आधारभूत असलेल्या तत्त्वज्ञानात पांडित्याचा प्रपंच नाही. भक्तिरसात न्हालेल्या संतांचा अनुभव, हेच त्या तत्त्वज्ञानाचे अंतिम प्रमाण होय.
- सकृद्दर्शनी असे वाटते, की भक्तीचे समर्थन करणारे तत्वज्ञान मध्वाचार्यांच्या मतासारखे द्वैतवादी असावयास हवे. देव हा भक्ताहून वेगळा असल्याशिवाय त्याची भक्ती करावयाची कशी ? केवलाद्वैत वेदान्ताच्या म्हणण्याप्रमाणे ब्रह्मच केवळ सत्य असले आणि मीच ब्रह्म असेन, तर भक्ती करावयाची कोणी आणि कुणाची?

- हा चिद्विलासवाद म्हणजेच वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान होय. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकारामांची गाथा हे तीन ग्रंथ म्हणजे, या तत्त्वज्ञानाची प्रस्थानत्रयी होय असे सांप्रदायिक म्हणतात, पण हा उपचार आहे. या ग्रंथांतून ते तत्त्वज्ञान अनुस्यूत आहे, असे म्हणता येईल, पण युक्तिवादपूर्वक, थोडासा पूर्वोत्तरपक्ष करून त्याची पद्धतशीर मांडणी ज्ञानेश्वरांनी अनुभवामृतात केलेली आहे. सारांशाने ते तत्त्वज्ञान असे : सर्वत्र केवळ एका आत्मतत्त्वाचे-म्हणजे चैतन्याचे-स्फुरण आहे. ते स्वसंवेद्य आहे.म्हणजे त्याच्या अस्तित्वाला कोणताही बाह्य पुरावा लागत नाही. त्यास ‘असत् ’ असे म्हणताच येणार नाही. कारण जो म्हणणारा तेच आत्मतत्त्व होय. त्याच्या अभावाचे भान होणार नाही. कारण भान (चित्) हेच त्याचे स्वरूप होय. हे चैतन्य आनंदरूप आहे, असा संतांचा अनुभव आहे. पण कापरामध्ये ज्याप्रमाणे शुभ्रता, सुगंध व मृदुता ही एकमेकांहून विलग नसतात, त्याच रीतीने चैतन्य, असतेपणा व आनंद ही आत्मतत्त्वात एकरूप असतात.

- हे आत्मतत्त्व एक असले, तरी क्रीडेसाठी देव आणि देवी या स्वरूपात ते आविष्कृत होते. जगताची ही मातापितरे आवडीमुळे एकमेकांत मिळत असतात. त्यांच्यापासून जगाची निर्मिती होते.
- शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्तात मानले आहे, की सच्चिदानंद-स्वरूपी ब्रह्मास अज्ञानाची उपाधी आहे आणि जगत् हे त्या भावरूप अज्ञानाचे कार्य आहे. पण ज्ञानेश्वरांनी या अज्ञानाचा 'धांडोळा' घेऊन त्याचे जगत्कारणत्व नाशाबीत केले आहे. अज्ञानाला कारण मानल्यास त्याचा आश्रय सांगावा लागेल. चैतन्य किंवा ज्ञान हा त्याचा आश्रय आहे, असे म्हणणे म्हणजे प्रकाशाला टेकून अंधार उभा आहे, असे म्हटल्यासारखे होईल. जगत् हे अज्ञानमुलक नसल्याने ते असत्य अथवा मिथ्या नाही. ते चैतन्याचा विलास आहे. स्वप्रीत्यर्थ ते नित्य नव्या रूपाने प्रगट होते. पाणी स्वतःमध्ये कल्लोळ निर्माण करून खेळत असते. तो कल्लोळ मिथ्या नव्हे अथवा पाण्याहून अन्य नव्हे.

- पाणी पाण्यास पिऊ शकत नाही. तृष्णेचे समाधान करण्याचे सामर्थ्य अंगी असूनही पाण्यास ते समाधान अनुभवता येत नाही. द्वैताची अपेक्षा आहे. चैतन्याच्या ठिकाणी असणाऱ्या सुखाचा अथवा प्रेमाचा आस्वाद घेण्यासाठी जीवरूपाने ते प्रकट होते. जीवाला अहंभाव टाकून तद्रूप झाल्याशिवाय ते प्रेमसुख मिळत नाही. राजा असल्यानेच राजेपण उपभोगता येते. भक्ति हा बाह्य संबंध नाही. सुगंधच घ्राणेद्रिय झाले, असे उत्कट भक्तिचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे.

# वारकरी संप्रदायाचीलोकप्रियता-

- वारकरी संप्रदायाला जी अमाप लोकप्रियता मिळाली, तिची काही स्पष्ट कारणे आहेत. सर्वसामान्यांशी ह्या पंथाने अत्यंत जिव्हाळ्याचे नाते जोडले उत्कट भक्ति, सदाचार, नीती ह्यांवर आधारलेला सरळमार्गी आचारधर्म ह्या संप्रदायाने सांगितला. कर्मकांडांना थारा दिला नाही. वारकऱ्यांची विठ्ठलभक्ती ही प्रवृत्तिपर आहे. समाजधारणेला पोषक होणारी कर्मे सोडण्याचा उपदेश ह्या संप्रदायाने आपल्या अनुयायांना कधीच केला नाही. कर्मबंधनाची यातायात टाळण्यासाठी प्रत्यक्ष कर्माचा त्याग केला पाहिजे, अशी ज्ञानेश्वरांचीही भूमिका नव्हती. नैष्कर्म्य आणि निष्क्रियता ह्यांत त्यांनी भेद केला. 'जे चालणे वेगावत जाये । तो वेगु बैसावयाचि होये । तैसा कर्मातिशयो आहे नैष्कर्म्यालागी ।।' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे (ज्ञानेश्वरी १८.१५३). वाटसरूने चालताना जलद पाऊल ऊचलले, तर त्यामुळेच तो मुक्कामी लवकर पोहोचतो आणि त्याला विश्रांती मिळू शकते. त्याचप्रमाणे कर्माचे भरपूर आचरण नैष्कर्म्याच्या कामी येते. असा ह्या ओवीचा अर्थ आहे. जनाबाईच्या दळणकांडणादी नित्यकर्मात प्रत्यक्ष विठ्ठलाने येऊन त्यांना मदत करावी किंवा एकनाथांच्या दारी पांडूरंगाने श्रीखंड्या होऊन राहावे, ह्या आख्यायिका ह्या संदर्भात बोलक्या आहेत. वारकरी संप्रदायाने ज्ञानाचे महत्व कमी आहे, असे कधीच मानले नाही, परंतु भक्तीला अग्रस्थान दिले. केवळ नामसंकीर्तनानेही ईश्वराच्या जवळ जाता येते, हे आत्मविश्वासाने प्रतिपादिले. 'नलगे सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण।' असे तुकोबांनी म्हटले आहे. वारकरी संप्रदायाने अग्रस्थान दिलेल्या भक्तिभावनेचा अत्यंत उत्कट आविष्कार संत नामदेवांच्या रूपाने पहावयास मिळतो. एखाद्या लडिवाळ लेकरासारखे ते ईश्वराजवळ जाऊ पाहतात. देवावर रुसणे, त्याच्याकडे हट्ट धरणे, पुन्हा त्याची करुणा भाकणे, अशा अनेक भावावस्था त्यांच्या अभंगांतून आपल्याला दिसतात. एकनाथांनी प्रपंच आणि परमार्थ ह्यांचा समन्वय साधण्यावर भर दिला.

- वारकरी संप्रदायाने संकुचित सांप्रदायिकतेला थारा न देता सर्वसंग्राहक वृत्ती जोपासली. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत जे विठ्ठल, तेच एका महासमन्वयाचे प्रतीक आहे आणि संतांनी शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इ. विविध धर्मधारांचा विठ्ठलाच्या ठायी संगम साधलाआहे. असे अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा नाथपंथीयांची होती, पण लोकांना सांगण्यासाठी त्यांनी नाथपंथाचे तत्त्वज्ञान सांगणारा ग्रंथ निवडला नाही, तर गीतेची निवड केली.

- वारकरी संप्रदायाच्या प्रवक्त्यांमध्ये विचारांची आणि भावनेची श्रीमंती होती, त्याचप्रमाणे त्याग, निष्ठा, सहिष्णुता, औदार्य असे गुणही होते. ज्ञानेश्वरादी भावंडांना संन्याशाची मुले म्हणून वाळीत टाकण्यात आले होते. तुकोबांचाही अनेक प्रकारे छळ झाला होता. पण त्यामुळे समाजापासून फटकून राहण्याची वृत्ती त्यांनी कधीही धारण केली नाही. ' तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात ' ही तुकारामांची उक्ती प्रसिद्ध आहे. तुकारामांच्या आधी होऊन गेलेल्या एकनाथांनीही सनातन्यांना न दुखावता त्यांच्या सद्भावनेला हात घालण्याची धडपड केली.

- वारकरी संतांनी राजाश्रयाची आस कधीही धरली नाही. शिवाजी महाराजांचे आमंत्रण येताच ' दिवट्या छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे' आणि 'राजगृहा यावे मानाचिये आसे । तेथे काय वसे समाधान? अशी प्रतिक्रिया तुकारामांनी अभंगां तून दिली. सामान्य माणूस हाच ह्या पंथाचा कायम आधार राहिला. लोकसंग्रह हे ह्या पंथाचे वैशिष्ट्य राहिले. प्रत्येक वारकरी आपापली कामे करूनच उदरनिर्वाह करीत असल्यामुळे भिक्षावृत्तीला ह्या पंथात थारा नाही. ह्या पंथाने तत्त्वचर्चेकडे पाठ फिरवली नाही आणि अंधश्रद्धेवरही आघात केले. अज्ञानावर आधारलेल्या उपासनेचा त्यांनी निषेध केला.

- वारकरी पंथाने देशी भाषेला जे महत्त्व दिले, ते महानुभाव पंथीयांनीही दिले होते. बौद्ध, जैन, लिंगायत ह्यांनीही देशी भाषेचा पुरस्कार केला होता. तथापि आपल्या विचारांना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वारकरी पंथीयांनी मराठी भाषेच्या जोडीला स्वतःचे असे एक तंत्र उपयोगात आणले. श्रोत्यांबद्दलचा आदरभाव त्यांनी कायम मनात बाळगला.ज्ञानेश्वरी हे गीतेवरील भाष्य असले, तरी तो एक श्रोतृसंवादही आहे. श्रोत्यांमुळे आपले वक्तृत्व फुलते, हीच भूमिका ज्ञानेश्वर घेऊन आहेत. ' प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा अर्चितुसे भक्ती ' असे त्यांनी एके ठिकाणी श्रोत्यांना उद्देशून म्हटले आहे. अन्य वारकरी संतांनीही श्रोत्यांशी समरस होण्यात धन्यता मानली. त्यामुळे इतर पंथीयांच्या तुलनेत वारकरी संतसाहित्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहोचले. ज्ञानेश्वरीत अपपाठ शिरले होते, ह्याचाच एक अर्थ असा, की ज्ञानेश्वरी गावोगावी अनेकांपर्यंत पोहोचली होती. वारकरी पंथाची ही सारी वैशिष्ट्ये त्या पंथाला जे सर्व थरांतील संतांचे असमान्य आध्यात्मिक नेतृत्व वेळोवेळी लाभत गेले त्यातून निर्माण झाली.

- ह्या संप्रदायाच्या अलीकडच्या काळातील थोर सेवेकऱ्यांमध्ये नानामहाराज साखरे, शं. वा. दांडेकर ऊर्फ सोनोपंत दांडेकर, भाऊसाहेब काटकर, विष्णुबुवा जोग, केशवराव देशमुख, बंकटस्वामी, धुंडामहाराज देगलूरकर, बाबामहाराज सातारकर अशा अनेकांचा समावेश होतो. प्रवचने, कीर्तने, ग्रंथप्रकाशन अशा विविध मार्गांनी त्यांनी ह्या संप्रदायाची सेवा केली. नानामहाराजांनी सार्थ ज्ञानेश्वरी प्रसिद्ध केली, तर विष्णुबुवा जोगांनी तुकारामबोवांच्या अभंगांची सार्थ आवृत्ती काढली. विष्णुबुवांनी आळंदी येथे वारकरी शिक्षणसंस्थाही काढली (१९१७).
-

# संदर्भ-


- १. खरे, ग. ह. श्रीविठ्ठल आणि पंढरपूर, आवृ. ३ री, पुणे, १९६३.
- २. ढेरे, रा. चिं. श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, पुणे, १९८४.
- ३. दांडेकर, शं. वा. वारकरी संप्रदायाचा इतिहास, १९२७.
- ४. नेमाडे, भालचंद्र, ' वारकरी चळवळीची आविष्कारशैली', टीकास्वयंवर, औरंगाबाद, १९९०.
- ५. पाठक, यशवंत, नाचू कीर्तनाचे रंगी, पुणे, १९८०.
- ६. सरदार, गं. बा. मराठी संतसाहित्याची सामाजिक फलश्रुती, आवृ. ४ थी, पुणे, १९५२.

- धन्यवाद